# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १५/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

**खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन जन्मठेपेची शिक्षा**

पो.स्टे. सावनेर :– दिनांक ०२/०९/२०१६ चे १६.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश नारायण पाढोडे, वय ५५ वर्ष, रा. अजनी पो.स्टे. सावनेर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. २५७/२०१६ कलम ३०२ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०२/०९/२०१६ चे १४.०० वा. पूर्वी आरोपी नामे– शांताराम कीसन मरसकोल्हे, वय ३२ वर्ष, रा. रंगारी ढोका ता. सौंसर जि. छिंदवाडा ह. मु. अजनी पो.स्टे. सावनेर याने त्याचे पत्नी सोबत घरगुती कारणावरून झालेल्या वादा वरून आरोपीची पत्नी नामे– सौ. शकुंनतला शांताराम (मृतक), वय २७ वर्ष, रा. ह. मु. अजनी पो.स्टे. सावनेर हिला धारदार शस्त्राने डोक्यावर मारून जिवे मारन्याचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद. आरोपीला दिनांक १६/०७/२०१९ चे १८.३४ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. अनिल सोनवने, पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १५/०२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. एस. बी. अग्रवाल अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम २३५ (२) भादंवि. नुसार कलम ३०२ भादंवि मध्ये जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास ३ महिने शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. जी.एन. दुबे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाजे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, विजय कुमेरीया यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर